लोकमत

# राज्यघटनेची मूल्ये समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार

## देवेंद्र फडणवीस यांचा संदेश : घर घर संविधान उपक्रमाचा प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** संविधान दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त घर घर संविधान उपक्रमाचा आज नागपूर येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या विशेष संदेशात राज्यघटनेची सर्व मूल्ये सर्व घटकांपर्यंत अधिकाधिक रुजविण्यासाठी कटिबद्ध होऊ या, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, आदिवासी व सामाजिक न्याय विभागाचे सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक विजय वाकुलकर, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखेडे, सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी किशोर भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, दिव्यांग यांचा सन्मान करण्यात आला.





संविधान दिनानिमित्त डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करताना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी व जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर.

### भारतीय राज्यघटनेचे मूल्य घरोघरी पोहोचविणार : विजयलक्ष्मी बिदरी

हर घर संविधान हे अभियान विभागातील सर्व जिल्ह्यांत पोहचविण्यासाठी आपण विविध उपक्रम हाती घेणार आहोत. यात शालेय विद्यार्थ्यांपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत, ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत व याच बरोबर प्रशासकीय यंत्रणेतील प्रत्येकापर्यंत भारतीय राज्यघटनेचे मूल्य पोहोचविले जाणार असल्याचे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी सांगितले.